Andharatel Thingya"
Madhukar Waghmare

# अंधारातील ठिणग्या

रात्री एकचा सुमार. सुसाट वारं झाडातून सळसळत होतं. काळचाकुट्ट अंधारात चिल्लारीच्या पांदीतून कंदीलाची भगभगती ज्योत आठ दहा पावलांबरोबर पुढं पुढं झपाझप जात होती. चौघंजण खांद्यावर तिडकी घेऊन वाटाड्याच्या हातातील कंदीलाच्या प्रकाशात चिपाडं तुडवीत पुढं जात होती.

'मला सोडा! मला सोड!! ...मी मेले न्हाय ... पाटील! पाटील...!'

चौघांच्या खांद्यावरील तिडकीत गुंडाळलेल्या देहातून अस्पष्ट ध्वनी वाऱ्यावर विरून जात होते.

० ०

अंधाराला मागे ठेवून पृथ्वी प्रकाशाकडे जात होती. आणि पूर्व दिशेला सूर्यांच्या लालबुंद गोळयाला स्मशानातील आगीच्या लालभडक भभभगत्या ज्वाळा चाटून ठिणग्या उडवत भडकावत होत्या. ते पहाताच अगदी सकाळी सकाळीच लोकात नकुशीच्या मृत्यूची कुजबुज सुरू झाली.

'... काळ आला मंजी, यळ टळत न्हाय! पण पोरगी बाकी लय कष्टाळू...'

'आव कुणी म्हंतं लागीर झालंय चिल्लारीच्या वड्यात मारत्या पैलवानानं झपाटली म्हणत्यात...'

'म्हंजी त्येचं देणं लय की...'

'आवं मग खरं हाय!, मारत्यानं झपाटलं की झटकाच झाला म्हणून समजा... लय देणं द्यावं लागतं. मागं न्हाय का आमच्या सर्जीला झपाटलं तवा दोन बोकडानं पण आटापलं न्हाय. पण त्येचंच नशीब म्हणा देवऋषी चांगला मिळाला तवा झाड सुटलं...'

'...पण नकुशी आपली गरीब, आण सासू तसली, दोघाची दोघं पोरं टाकून तरणी ताठी पोरगी मेली! तिला वाचवायसाठी पाटलानं पण खटपट केली म्हंत्यात देवऋषाचा खर्च पण त्येनंच केला. पण देवानं बोलावल्यावर कुणाचं काय चालतंय व्हय!'

'तरच म्हंत्यात मरताना सुद्धा नकुशी पाटलाचाच नाव घेत व्हुती.'

नकुशीच्या मृत्यूची वार्ता गावभर बोलू लागली. जो तो आपापल्या परीनं मत व्यक्त करत होता. चिमटभर गोष्टीला डोंगराएवढं रूप देणं आणि डोंगराएवढी गोष्ट मनात ठेवणं हा खेड्यापाड्यातील लोकांचाच नव्हे शहाण्या लोकांचा पण नियमच बनलेला आहे. खरे काय आणि खोटे काय? सत्या-असत्येची जिज्ञासा कोण करतोय. काही वेळेला सत्य समजून सुद्धा त्याकडे डोळेझाक केली जाते. नकुशीच्या जीवनात असंच घडलं.

दोन दिवसांपूर्वीच नकुशी घरात आल्यावर हिरव्या मिरच्या वाटत होती. तेव्हा तिची सासू आली आणि तिला म्हणाली;

'मिरच्या वाटून घाल आता डोंबलावर! ऊठ तिथनं मी करते ते, जा पाटलाच्या वाड्यावर ...'

'का? कशासाठी??' नकुशीने विचारले.

'आगं टवळे, मलाच इच्यारतीस व्हय्?'

'आत्याबाई, असं रागावता कश्यापायी?'

'न्हाय तर काय तुज्या पाया पडू का!'

नकुशीचा आणि तिच्या सासूचा संवाद चाललेलाच होता. तेवढ्यात नकुशीचं पोरं धावत घरात आली आणि ती म्हणू लागली,

'आई गं भाकर दे आम्हाला
भूक लागलीय!'

'बघ पोरं काय म्हंत्यात, आता उठतीस नव्हं!' सासू शांतपणे बोलू लागली.

'पाटील म्हणत्यात तुमच्या सुनंला पाठवा माझ्याकडं.'

'मलाच कशाला !' नकुशीने तुसडेपणे उद्‌गार काढले.

'रांड, काय घालतीस पोरास्नी मग ! गेल्या हप्त्याची मजुरी अडलीय नव्हं त्याच्याकडं. देतू म्हणत्यात आज सांजला.'

'आत्याबाय्, असं करा, पाटील मजुरी देतो म्हण त्यात तर तुमीच या घेऊन लगभग !'

माझ्यावरच टाकतीस व्हय रांड !', सासू कडवटपणे पुन्हा बोलू लागली.

'मला सांजची वाट सुधारत नाय् ! मग तुज्या कशयाला नादी लागतीया'

'मग पाटलालाच बोलवायचं व्हतं इकडं मजुरी घिऊन !'

'मोठी राज्याची राणी झालीस का ? पाटलांना इकडं बवातीस व्हय. राजाच घर पडल नव्ह पाटील इथं यायचे, मग तू मजूरी घ्यावी, वा ग बहाद्दरने! ... नकुशे, तू जनम नकूसा केलास बघ ! रांड, हायस म्हणून बर ! देवानं कसं माज्या पोरालाच नेल वढून. तुला कश्याला ठिवलं. तूच टळली असतीस तर घासभर खाया तरी आलं असतं ! पण काय ही मग्रूरी कामधंदा करून श्यानपण. पोटाला तुकडा न्हाय! नकुशे मला एकच सांग, जातीस का न्हायस तू ?'

'कुठं ?' नकुशीने विचारलं.

'अग रांडं ! तरी मला वाटलंच व्हुतं तू असं ईचारशील म्हणून!' थांब आता तुझ्याकडेच बघते! मेलीस तर पुरावलीस !' असे रागाने म्हणतच सासूनें चुलीवरील फुंकणी हातात घेतली व एक जोराचा रपाटा नकुशीच्या पाठीवर लगावला. नकुशी हलकेच विव्हळली. पण तिला हा नेहमीचाच नियम माहीत असल्यामुळे तिला वाटावं तितकं दुःख वाटण्यासारखं विशेष नव्हतं. तिच्या सासूने दुसरा रपाटा मारायच्या अगोदरच नकुशीची पोरं तिच्या पाठीवर पडली. त्यांनी रडून गोंधळ घातला, तेव्हा नकुशीने हातातील काम तिथच ठेवले व ती उठून उभी राहिली.

'तुमाला काय आलं रडायला ?'

पण सासू ओरडली, 'कश्यालारं रडताय ! खा तिला तोडून सटवी हाय !'

'आज्ये गप बस!' नकुशीच्या पोराने रडत आवाज केला.

'आरं तू पण तिच्यावरच गेलास, माझ्या पोराच गुण न्हाय उतारलं.

सासू तोंड वंगाडत ठणकावित होती

'वरं बास झालं आता ! रोजचं मड त्येला कोण रड तसं हाय आपलं, मीच टळती कुठं तरी !' असे म्हणत नकुशी झपझप झोपड्यातून बाहेर चालली तेवढ्यात तिचा लहान मुलगा धावत बाहेर आला

'आय गं ! कुठं चाललीस ? आमाला भूक लागलीयं !'

'बाळा ! घरात जा !' नकुशीला दाटून आले. ती थांबली. तिने मुलाला उचलून घेतले. त्याचे पापे घेऊ त्याला खाली ठेवले. त्याच्या डोक्यावरील केस कुरवाळीत ती त्याला समजाऊ लागली.

'बाळा, ! घरात जा !'

'पण तू कुठं चाललीस ?' दुसऱ्या मुलाने येऊ प्रश्न केला.

'परत येती लवकर !'

'मग आमी पण येतू तुज्या बरोबर !'

नकुशीने दोघाना पुन्हा कुरवाळले व पुन्हा त्यां पापे घेत ती म्हणू लागली,

'बाबानू, दीस मावळलाय आता, रातचं अंदार कश्याला येता ? जावा घरात !'

'मंग सांग तू कुठं चाललीस ?'

'पाटलाच्या वाड्यावर जातेय मी ! पैसं आणाव हायत नव्हं ! तुमाला भूक लागली ना ? मग ज द्या वरं मला, पैसं घिऊन येते मग भाकरीला आणू आपण...

'आई गं ! लवकर ये !'

मुलांनी आईला निरोप दिला. आणि नकुशी झ झप पावले टाकत रस्त्याकडे वळली.

सूर्य नुकताच मावळलेला होता. आकाशात क्षिति वरील लालरंग सुद्धा काळसर होत होता. पक्षी किर चिवाट करीत थव्या थव्यांनी त्यांच्या घरट्याकडे चा

[illegible]. कामावर गेलेले सर्व लोक विश्रांतीसाठी घराकडे परतत होते.

पण नकुशी मात्र घरातून निघून पाटलाच्या वाड्या-कडे चालली होती.

ती रस्ता चालली होती. तिचं लक्ष कुठेच नव्हतं. खरं म्हटलं तर तिला पाटलाकडे भीक मागायला अगर मजुरी आणायला जायचं नव्हतं. तिचं मन पण धजवत नव्हतं पण आता इलाजच नव्हतं. तिच्या डोक्यात विचार. चक्र सुरू झालं होतं तिच्या गरीब जीवनाचच.

पण अचानक ती क्षणभर थांबली. कान टवकारले. विहीरीवरील मोटेवर गीत गाईले जात होते.

मोट हाकणारा, बैलाना चाबकाचे फटकारे मारत गीत गात होता. आणि गीत थांबले —

पण नकुशीला भडभडून आले. गतवर्षीच्या आठव-णीने तिच्या डोळ्यातून अश्रू ठबकले.

तिला आता कोण समजणार ? दिवसभर ती याना त्या शेतात राबत होती. मजुरी पण अपुरी. ती पण वेळेवर मिळत नव्हती. पोटाचा प्रश्न भेडसावत होता. दिवसभर राबायचं. काम करून आल्यावर सासूचं बोलणं खायचं. अन्नासाठी याच्याकडं- उसनं माग. त्याच्याकडं उसनं माग. पण रोज कोण द्यायला बसलंय? पण हे नकुशीचं दुःख नेहमीचं होतं. त्यात तिचा नवरा असता तर तिचा बोजा थोडाफार कमी झाला असता. पण तिच्या नशिबी ते भाग्य नव्हते.

o o

त्याचं असं झालं. भर दुपारची वेळ. नकुशी भाक-रीच्या चवड्या, हातात भाजी भरलेलं गाडगं घेऊन रणरणत्या उन्हातून, पाटलाच्या विहीरीकडे चालली होती.

मोटेवर गीत गाईले जात होते. त्या आवाजाच्या धुंदीतच सर्व जगाला विसरून ती काटेरी कुंपणाना दूर सारत आंब्याच्या वनराईतून, शेताच्या बांधाबांधाने वहात असणाऱ्या पाटाच्या पाण्याच्या शेजारील पाय-वाटेने चालली होती.

मध्येच गीत थांबले, आवाज क्षीण झाला. नकुशी रस्त्यातच थांबली, तिने कान टवकारले. इकडे तिकडे डोळे भिरकावले. ऊन रसरसतच होतं. पाटातून पाणी झुळूझुळू वहात होतं. शेतातील पिकात खुसपूस ऐकू येत होती.

गीत थांबले ...!

तिचा विश्वासच बसेना, ती गांगरली, हृदयात कंपने वाढू लागली. शंका कुशंकेने तिचा थरकाप उडाला आणि भरदाव वेगाने ती विहीरीच्या दिशेने धावू लागली.

विहीरीवर मोट थांबलेली होती. आणि वादीचा चाबुक घेऊन पाटील मोटकऱ्याला बडवत होता. मोट-करी गडबडा लोळत होता आणि पाटील चाबकाचे फटकारे त्याला मारतच होता. हतबल झालेला मोट-करी नकुशीचा नवरा होता. तो विव्हळत होता आणि काकुळतीने पाटलाला विनवत होता,

'पाटील ! पाटील !! माफ करा !

चूक पुन्हा घडायची न्हाय !!

पाटील ! माफ करा ! ...!'

नकुशी तेथे पोहोचली. तिची शंका खरी ठरली. तिनं हातातील गाडगं दूर भिरकावलं. त्या आवाजाने पाटील थांबला.

'मालक ! मालक !!' म्हणून तिने आक्रोश केला. जवळ जाऊन तिने मोटकऱ्याला उठविण्याचा प्रयत्न केला. स्वतःच्या मांडीवर तिने त्याचे डोके घेतले. तिच्या डोळ्यातून निघणाऱ्या अश्रूधारा त्याच्या कपा-ळावर पडत होत्या. त्याच्या पाठीवर वळ उठले होते त्यातून रक्त पाझरून ते गोठत चाललं होतं.

पाटील रखरखती नजर टाकून केव्हाच निघून गेलेला होता.

त्यानंतर आठदहा दिवसातच मोटकरी मोट हाकता हाकता विहीर कोसळल्यामुळे मरण पावल्याची वार्ता गावभर पसरली. नकुशी एकाकी बनली.

o o

विचारांच्या नादात नकुशी एक–दीड मैल चालून पाटलाच्या वाड्यापर्यंत केव्हाच पोहोचली होती. वाड्यातून पाटील गरजल्याचा आवाज येत होता. आणि तो ऐकून नकुशीच्या पावलाचा वेग मंद मंद होत होता.

वाड्याच्या एकदोन पायऱ्या चढून नकुशी थांबली. पुढील दरवाज्यातून ती आत पहात होती. तक्क्याला

टेकून पाटील आरामात सुखावत होता. त्याच्या नोकरा-वर तो कडाडत होता.

नकुशीला आठवण झाली तीनचार महिन्यापूर्वीची. तिचे विचारचक्र गिरक्या घेऊ लागले.

नकुशीचा नवरा मेल्यावर दिवसभर पाटलाच्या वाड्यावरच ती धुणी-भांडी, केर-कचरा, अशा घर-कामासाठी राबत होती. दोन पोरांचं, सासूचं व तिचं पोट त्यावर भरत असे.

मध्येच पाटलाची बायको माहेरी गेल्यामुळे पाट-लाच्या घरादाराची निगा नकुशीवर पडली. नकुशी प्रामाणिकपणे तेथे राबू लागली.

एके दुपारी स्वयंपाक आटोपून, नकुशी पाटलाच्या आराम खोलीमध्ये जाऊन त्याला म्हणाली,

'पाटील, यळ झाली ! जेवून घ्या ?'

सुस्तावलेला पाटील उठत उठत तिला शांतपणे म्हणाला,

'थांब नकुशे !'

'बोला पाटील !' नकुशी उद्‌गारली.

'आज बघ मला आनंद वाटतोय. किती सुंदर दिवस उजाडला आज ! थांब तू जाऊ नकोस इथं बस !' उठत उठतच पाटील चेहऱ्यावर हास्य उमटून उद्‌गारत होता.

'का वो पाटील !' चाचरतच ती म्हणाली,

पाटलाची भिरभिरती नजर नकुशीच्या देहावर खिळली. त्याच्या लालबुंद बनणाऱ्या डोळ्यातून उष्ण-तेच्या लाटा नकुशीला चटके देऊ लागल्या.

'थांब ! नकुशे !! '

नकुशी उभीच होती. तिला काहीच कळत नव्हतं. दरवाज्यातून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकेनं तिचे केस भुर-भूर उडत होते. पाटलाच्या दृष्टीतून ती स्वतःचा पदर सावरीत होती.

पण......

खोलीचा दरवाजा खाडकन बंद झाला. आणि दारा-मागील भला मोठा आटना पाटलाने ओढून घेतला.

'हे काय करता पाटील ?'

भयभीत होऊन नकुशीनं विचारलेल्या प्रश्नाचे ध्वनी खोलीत घुटमळत दरवाज्याच्या चिरेतून बाहेर पडत होते.

पुरुषी पंजात नकुशीचे कोमल बाहू केव्हाचं हतबल झाले.

दार उघडलं गेलं. थरथरत्या शरीरानं लाजेनं मान खाली घालून नकुशी वाड्याबाहेर पडत होती. तिच्या छातीवरील कपडे चोळवटून गेलेले होतं. डोक्यावरील पदराच्या चिंध्या झालेल्या होत्या. नकुशीचं सर्व शरीर पिळलं गेलं होतं.

तेव्हापासून पाटलाकडे आणि त्याच्या वाड्याकडे नकुशीने केव्हा ढुंकून सुद्धा पाहिले नव्हते. पाटलाच्या वाड्याचं तिने काम सोडले.

पण पुन्हा तिला कामावर येण्यासाठी पाटलाने महिनाभर निरोप दिले. तिच्या सासूला बोलवून तिला यावयास सांगितले. सर्व निरोपांना तिनं धडधडीत शिव्यानंच प्रत्युत्तर पाठवलं. पण त्यामुळे तिची सासू तिला जास्तच जाच करू लागली. इतर लोकही नकु-शीला कडवट बोलू लागले होते. दीडदोन महिन्यातच तिच्या पोटात गर्भधारणा झाल्याची चिन्हे तिला जाणवू लागली आणि ती निराश होऊन मार्ग शोधू लागली.

पण आज नकुशी पाटलाच्या वाड्याच्या पायऱ्या चढत होती. नव्हं चढणं भाग होतं. परिस्थितीनं तिचा चांगलाच कोंडमारा केला.

नकुशीनं पायऱ्यावर उभं राहूनच आवाज केला, 'पाटील, आवो पाटील !'

नकुशीचा आवाज ओळखून पाटील थोड्याच वेळात दरवाज्यात येऊन उभा राहिला. तिला पाहून तो म्हणाला,

'कोन गं तू ?'

'वळक इसारला व्हय !' जणू काही घडलेच नाही असा अविर्भाव आणून नकुशी उद्‌गारली.

'नकुशे का आलीस तिनी सांजला ? इतके दिवस बोलावून तू आली नाहीस आणि आज कशी टपक-लीस ?' पाटील रागाने विचारत होता,

'कोण समजतेस तू स्वतःला ?'

'पाटील, वाद घालायला नाय आले मी !

सासूबाईची गेल्या हप्त्याची मजूरी द्या !!'

'मंग तू कश्याला आलीस ? पाठव तुज्या सासूला चल हो चालती !!'

'पाटील, मी जाते पण मजुरी द्या !'

आसुला पाठव म्हटलना ! निघ बर !!'

पाटील !!, आवं पोरं उपाशी मरत्यात, आनाचा [illegible] म्हाय घरात. द्या काय तरी !'

विनवणी करत नकुशी पाया पडते. पण लाथेने पाटील तिला दूर भिरकावतो. पायऱ्यावरून नकुशी कोसळते. ती विव्हळते. तोच दुसरी लाथ तिच्या पोटावर बसते.

नकुशीला तिरमिरी येते. भोवळ येऊन ती धडपडते आणि तश्यातच अडखळत ती बोलते,

पाटील ! पोटावर ! पोटावर का मारलत—तुमचच पोर—'

तिचे शप्द ऐकून पाटील चरकला. इकडे तिकडे पाहिले. कोणी ऐकत नसल्याची खात्री करून घेतली आणि पायऱ्यावरून पडलेल्या नकुशीला तो हलवत म्हणाला,

'नकुशे ! नकुशे !!'

नकुशी बेशुद्ध होऊन पडलेली होती.

नकुशी शुद्धीवर येत नसल्याची चिन्हे ओळखून नोकरांची मदत घेऊन पाटलाने तिला तिच्या घरी पोचती केली.

'काय झालं पारीला ?' नकुशीच्या सासूनं विचारलं.

पण नकुशी शुद्धीवर नव्हती !

'पाटील तुमच लय उपककार झाल आमावर !' सासू बोलली.

पाटील स्वत: जातीनं हजर राहून त्याने नकुशीच्या शुद्धीवर येण्याची वाट पाहिली.

अखेर देवऋषी बोलावले.

तासाभरात देवऋषी हजर झाले. तिच्या बेशुद्धावस्थेत तिच्या अंगावर देवऋषीने अंगारा फुंकला. मंत्र पुटपुटला आणि उडदाच्या दाण्यानी तिच्यावर मारा केला. नकुशी थोडीफार शुद्धीवर होतीच. तिनें डोळे हालवले. देवऋषी तिला विचारू लागला,

'बोल तू कोण हायस ?'

नकुशीला उत्तर देता येत नव्हतं. पण तिने डोळे उघडल्यानंतर पाटील उठला. देवऋषीला जवळ बोलावून त्याने त्याच्या कानात सांगितले, 'मागाल तेवढं पैसं मिळतील, पण बाई खलास--!'

पाटलाने देवऋषीच्या कानात पुटपुट करून त्याच्या हातावर थोडीफार नाणी टेकवली. आणि मग देवऋषीच्या अंगात दुप्पट बळ चढलं. तो मोठ्याने म्हणाला,

'पाटील, जावा तुमी ! मी काळजी घेतो ! भूतबाधा उतरतो !'

आसपासच्या बायाबापड्यानी तेथे गर्दी केली. आणि नकुशीची सासू पाटलाला म्हणाली,

'पाटील मोठं उपकार झाल आमावर' पाटील त्याच्या वाड्यावर निघून गेला.

इकडे देवऋषीने वेताची लांब काठी काढली आणि तो म्हणाला,

'बघा ! बाई रातची गेली कुठं ! झुटींगान झाड धरलय !...' असे म्हणतच देवऋषीने वेताच्या काठीने नकुशीला बडवायला सुरवात केली. आणि त्यामुळे नकुशीने उघडलेले डोळे पुन्हा झाकले.

देवऋषी पुन्हा पुन्हा विचारत होता,

'बोल तू कोण हायस ?

तुला काय पाहिजे ?

झाड सोड...!...!'

नकुशी पुन्हा बेशुद्ध पडली. आणि 'झाड गेलं ! झाड नेलं !' असं देवऋषीने जाहीर केलं.

तास दीड तास नकुशीच्या डोळ्याची पापणी हालली नाही. हात-पाय हलवले नाहीत. ती बेशुद्धावस्थेतच ती मेल्याचे देवऋषीने जाहीर केले, आणि मृतदेहासाठी तडकी, जाळावयाची लाकडे आणण्यासाठी त्याने पाटलाकडे निरोप पाठवला.

पाटलाकडे सर्व व्यवस्था तावडतोब करूनच ठेवलेली होती.

झाले. सर्व काही धार्मिक विधी आटोपून नकुशीचा देह तडकीवर ठेवला गेला. आता तडकी उचलणार पण?

नकुशीच्या सासूने नकुशीच्या मुलांनी तिचे दर्शन घेतले नसल्याचे सांगितले. मुले भुकेने व्याकुळ होऊन केव्हाच झोपी गेलेली होती. त्यांना उठवण्यात आलं. पोरांना कशाचा थांग पत्ताही नव्हता.

'आई झोपलीस व्हय ! असे ओरडत मुले तिच्या अंगावर पडली.

'आई ऊठ ! तू लवकर येती म्हणालीस ! तुझी वाट बघत आम्ही झोपलो !

आई, भूक लागली, भाकरी दे आम्हाला !' आक्रोश करत मुले नकुशीला उठवत होती. त्यांची हाक ऐकून नकुशीने डोळ्याच्या पापण्या हलवल्या. आणि तिच्या कंठातून अस्पष्ट ध्वनी निघाला. पण देवऋषीच्या हे लक्षात येताच त्याने ताबडतोब मुलांना बाजूला ढकलले आणि तो म्हणाला.

' हे बोलणारे नकुशी नव्हं ! भूत बोलतय ! झुटींग बोलतोय ! !

सर्व लोक स्तब्ध झाले. आणि नकुशीचा कंठ मात्र पुन्हा पुन्हा अस्पष्ट ध्वनी हळुवारपणे बाहेर फेकत होता.

मुलांनी रडून गोंधळ माजवला. त्यांनी आईच्या देहावर झेप टाकण्याचा पुन्हा पुन्हा अयशस्वी प्रयत्न केला. तेव्हा देवऋषी नकुशीच्या सासूला म्हणाला,

' आजीबाई, या मुलांना आवरा. एक झाड धरलय ते सुटत न्हाय. पण या दोघा मुलाना पण ते धरल. झुटींग मोठं हाय ! त्याची भूक मोठी हाय ! म्हणूनच असा झटका झाला ! !'

जमलेल्या लोकानी देवऋषीच्या म्हणण्याला रूकार दिला आणि नकुशीच्या सासूलाच सर्वजण बोलू लागले. धरून सुद्धा मुले ऐकत नसल्यामुळे त्यांचे हातपाय बांधून त्याना घरात ठेवले. मुलानी आक्रोश जोरातच सुरू केला. तो ऐकून नकुशीचा कंठ पुन्हा पुन्हा हलू लागला.

' बघा पिशाश्च कस हाय !' देवऋषी सांगत होता ' कार, एक नेलस ती नेलस आणिक पोरास्नी पण न्हेतूस व्हय.

' हो, मला माझी पोर द्या !' नकुशी कंठ हलवत होती, ' सोडा मला, सोडा मला ! !

मी मेले न्हाय ! ! पाटील ! पाटील ! !'

देवऋषी पुन्हा पुन्हा मंत्र म्हणू लागला. उडीद–तांदूळ घेऊन तो नकुशीच्या देहावर मारू लागला. वेताच्या दोन तीन काठ्या पुन्हा त्याने मारल्या सुद्धा. नकुशीचा कंठ पुन्हा हलू नये म्हणून त्याने कापडाचा बोळा करून तिच्या तोंडात कोंबला.

नकुशी आता एकदमच दुबळ झाली. होत असलेल्या घटना तिला जाणवत होत्या. पण तिचे ऐकून घ्यायलाच कोणी तयार नव्हते. उलट ती बोलत नसून तिच्या अंगातील झोटिंग बोलते आहे असाच सर्वांचा झाला.

रात्री एकचा सुमार. तडकीवर गुंडाळून नकुशीचा देह अंधाऱ्या रात्री चौघांच्या खांद्या स्मशानाच्या दिशेकडे झपाझप पावलानी जाऊ लाग

अंधारात कुत्री केकाटत होती. घुबडे घुमत हो

० ०

स्मशानातील धग कर्म होता होता तिसरा दिव उजाडला.

आज नकुशीची माती होती. माती सावडण्यासाठी गावातील लोकांचा, बाया-बापड्याचा लोंढा स्मशाना जवळ थांबलेला होता.

भर दुपारी लोक उन्हात रखरखत गोल उभे होते. मध्य भागावर गुलाल फासून एक अणकुचीदार दग रोवलेला होता. सर्वजण आशेने आसपास पहात होते. तीस चाळीस कावळे झाडावर बसून काव, काव ओरडत नैवेद्याकडे झेप घेत होते.

नैवेद्याला कावळा शिवत नसल्यामुळे बाया-बापड्या कुजबूज सुरू झाली.

' बायची काळजी माग राहिली. तिचा जिव पोरात घुटमळतच आसल ...'

' लहान नांदती पोरं ! खरच हाय ! !'

' पण, पाटलानी पण यायला पाहिजे व्हत !'

' अरे, पाटलाना कोणी बोलायला धाडल नाय का?'

' पाटलाच मोठ उपकार हायत पोरीवर !'

नकुशीच्या सासूने मध्येच उद्गार काढले,

' पाटलातच जिव अडलाय तिचा !'

' पण पाटलाना मी बघून आलो, सकाळीच पाटील शिकारीला गेल्यात.'

उन्हाने किलकिलते डोळे मिचकावित एका म्हाता-ऱ्याने सूर ओढला.

आणि पाटील खरोखरच बंदूक लटकवून शिकारी-साठी जंगलात सकाळपासून वण वण भटकत होता तहानेने व्याकूळ झाल्याने डोंगर कड्यावरून तो आपल्या सहकारी शिकाऱ्यांना सांगून खाली झऱ्यापर्यंत पोहोचला

पाणी पाहताच त्याला आनंद झाला. त्यानं बंदूक खडकावर ठेऊन पाणी पिण्यासाठी गुडघ्यावर पाल

[illegible] तोंड पाण्यात बुडवले. पाण्याचे घटाघटा चार [illegible] घोट पितो न पितो तोच कसला तरी आवाज झाला. तोंड वर उचलून क्षणभर थांबून पुन्हा तो पाण्यात तोंड घालणार... पण तो थांबला, त्याने डोळे विस्फारून पाण्याकडे एक टक पाहिले.

खडकावरील त्याची बंदूक दूर भिरकाऊन हातात धारदार कोयता घेऊन उभ्या असलेल्या त्याच्या शत्रूचे प्रतिबिंब तो पाण्यात पहात होता.

ते पाहताच त्याचं काळीज कापलं गेलं ! हृदयाचं पाणी झालं. रक्त गोठल्याप्रमाणे त्याचा चेहरा काळ ठिक्कर पडला. आणि भयभीत होऊन गळाठलेल्या अंगानं तो कसाबसा उभा राहिला.

आणि

'भूत ! भूत ! ! ...'

असा दणकट पण पाटलाचा भयभीत आवाज दऱ्याखोऱ्यातून घुमत डोंगर कड्यावरील दोन शिकाऱ्यांच्या कानात घुसला.

धावत धावतच ते झऱ्याच्या दिशेने भयभीत होऊन वाऱ्याला कापू लागले. खाली पोहोचून खडकावर उभे राहून त्यांनी जे पाहिलं त्यानी त्यांच्या डोळ्याची बुबुळेच गरगर फिरू लागली.

शिरापासून वेगळं झालेलं पाटलाचं धड रक्ताच्या थारोळ्यात धडपडत होतं. रक्तानं माखलेला धारदार तळपणारा कोयता जीवाचा आसूस घेऊन पडलेला दिसत होता.

...खून ! ...खून...! पाटलाचा खून... !'

चाचऱ्या आवाजात भेदरलेल्या कंठातून निघणारे स्वर गावाकडे धावत सुटले.

नैवेद्याला कावळा शिवल्यानंतर उठून चाललेल्या लोकांपर्यंत रस्त्यातच पाटलाच्या खुनाची वार्ता येऊन मिळाली. नकुशीच्या मातीला आलेले पावणे ही वार्ता घेऊनच पंचक्रोशीत घुसले. संध्याकाळी पाचच्या आतच पोलिसांच्या काळ्या गाड्या लोकांना दूर सारत खुनाच्या झऱ्यापर्यंत पोहोचल्या.

गावात आता मात्र लोक फारच घाबरले होते. दहशतीचं वातावरण सर्वत्र पसरत होतं आणि प्रत्येकाच्या तोंडून भूताचाच विषय थरथरत्या ओठांनी बोलला जात होता.

'झोटिंग खवळलय फार ! परवा नकुशी गेली, आज पाटील गेला आता उद्या कुणावर येळ हाय ! ! ...!'

'पण आस कस घडल ? पाटीलाना पण झुटींग लागल !'

पोलिस चौकीतील अधिकाऱ्यांची विचारचक्रे पुढे पुढे धावू लागली आणि खून करणाऱ्या भूताच्या शोधासाठी पोलिस, सी. आय. डी. संबंध पंचक्रोशीतील दऱ्याखोऱ्यात शोध घेऊ लागले.

आणि दुसऱ्याच दिवशी खुनी गुन्हेगार सापडल्याची वार्ता गावभर पसरली.

गुन्हेगाराचा गुन्हा पुराव्यासहीत शाबीत होण्यासाठी गुन्हेगाराला बंद बेड्यात घट्ट बांधून पोलिसांची गाडी गावाकडे धाऊ लागली.

'पाटलाचा खुनी सापडला ! भूत सापडलं, झोटिंग पकडलं गेलं ! ...!'

हा हा म्हणता प्रत्येकाच्या कानापर्यंत वार्ता पोहोचली. आणि प्रत्येकजण ते खुनी झोटिंग पाहण्याच्या जिज्ञासेनं रस्त्यावरील गर्दीत कुजबुजत मिसळू लागला.

स्मशानाच्या दिशेनें सर्व लोक बांधावरील पायवाट तुडबीत वाऱ्याप्रमाणे धावत जाऊ लागले.

आणि पोलिसांची काळी गाडी मध्येच येऊन थांबली.

गाडीभोवती लोक गराडा करू लागले. परंतु तेवढ्यात गाडीचं दार उघडलं आणि हातात लाठ्या घेऊन लोकांना बाजूला सारत पोलिस खाली भरभर उतरू लागले.

दरवाज्यावर सर्वांचं लक्ष वेधलं गेलं. पण काय ?

साखळ दंडात करकचून आवळलेल्या बाहूना सावरत नकुशी भिरभिरत्या उग्र नजरेने दरवाज्यातून बाहेर येत होती.

'नकुशी ! नकुशी ! ! आँ ! आँ ! ! ... भूत ! भूत ! !' असे म्हणत सर्व लोक भितीनं दूर सरकू लागले.

सर्वांच्या हृदयाचे पाणी झाले आणि शिगेस पेटलेल्या उत्सुकतेच्या जागी भीतीनं हृदयाच्या ठिकऱ्या पडू लागल्या.

पण,

खाली येऊन नकुशी बोटाने जागा दाखवत पोलिसांना म्हणाली,

'—याच जागेवर तडकी ठेऊन माझा देह उतरला. तडकीवर गच्च आवळलेल्या दोऱ्या सैल झाल्या आणि भरदाव थंड वाऱ्याने मला चांगलीच शुद्ध आली.

मला आठवतय...

लाकडाच्या रचलेल्या चितेवर मला जेव्हा ठेवलं तेव्हा जीव वाचवण्यासाठी सर्व बळ एकवटून मी चितेवरून ताडकन उठून पहाडाच्या रस्त्यानं सुसाट धावत सुटले...!'

नतर नकुशीन तिला तडकीवरून ज्यांनी आणलं त्यांची नावे सांगितली. पोलिसांनी त्या लोकांना बोलावून जेव्हा विचारलं तेव्हा त्यानी जबाब दिला. ते म्हणाले,

'हे सगळं खरं हाय! चिता पेटवायच्या आतच नकुशीनं उडी मारून अंधारात पळ काढला हे खरं हाय!'

'मग त्या चितेत कोणाला जाळलरं भडव्या?' पाठीत ठोसा लगावत पोलिसाने त्या माणसाला विचारलं. तेव्हा त्या चौघांपैकी एक जण म्हणाला,

'पोलिसदादा, मी देवऋषी हाय!'

पोलिसाने त्याच्या गालफाडात लगावत विचारलं 'बोल कोणाला जाळलं तिथं?

'न्हाय कुणाला! न्हाय...'

'मग काय केलं?'

तेव्हा देवऋषी सांगू लागला,

'नकुशी पळून गेल्याचे पाटलाला कळलं असत तर पाटलानं आमाला जिवंत ठेवलं नसतं. म्हणून ती पुन्हा उठून पळून गेलं असं मी या तिघांना सांगितलं. त्यांना पण खरं वाटलं...

कोरडी चिता पेटवून नकुशीला जाळल्याचं दाखवाव लागलं आमाला! ...!'

बराच वेळ जाब घेतले गेले.

रात्री एकचा भयाण काळोख. शवविच्छेदन केलेल्या पाटलाच्या मृत देहाचे तुकडे चितेवर ठेवून त्यावर रॉकेल ओतले गेले आणि साखळदंडात करकचून आवळलेल्या नकुशीनं पेटता पलिता टाकला—

काळोख उफाळू लागला आणि स्मशानात अंधाराला भेग पाडत उफाळत्या, भडकत्या ज्वाला, ठिणग्या उडवत धगधगू लागल्या.

**मधुकर वाघमारे**